**शालेय पोषण आहार योजनेंतर्गत "स्नेह भोजन" उपक्रम राबविण्याबाबत.**

# महाराष्ट्र शासन
## शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
## शासन निर्णय क्रमांकः शापोआ-२११५/प्र.क्र.१५/एस.डी.३

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक: १३ ऑगस्ट, २०१५

वाचा :- शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक : शापोआ-२०१०/प्र.क्र.१८/प्राशि-४, दिनांक २ फेब्रुवारी, २०११

**प्रस्तावना :-**

शाळेतील विद्यार्थ्यांची उपस्थितीत वाढ व कुपोषण मुक्तता करण्यासाठी शालेय पोषण आहार योजना सुरु करण्यात आलेली आहे. सदर योजनेमध्ये आवश्यकतेनुसार बदल करण्यात आलेले आहेत. कोणत्याही योजनेची अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे होण्यासाठी योजनेमध्ये लोकसहभाग आवश्यक आहे. शालेय पोषण आहार योजनेत वैविधता, नाविन्यता आणण्यासाठी व समाजाचा सहभाग वाढविण्याच्या हेतुने विशेष दिनाचे औचित्य साधुन विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार योजनेंतर्गत चांगला आहार देण्याचा उपक्रम लोकसहभागातून राबविणे आवश्यक आहे. लोकसहभागामुळे शिक्षण क्षेत्रात समाजाचा सहभाग वाढेल, विद्यार्थी उपस्थिती वाढण्यास मदत होईल. तसेच, विद्यार्थ्यांच्या वाढीस उपयोगी असणारी पूरक पोषण मूल्ये प्राप्त होतील. आहाराची पौष्टिकता वाढण्यास मदत होईल, विद्यार्थ्यांना वैविध्यपूर्ण अन्न पदार्थाची चव चाखता येईल, तसेच सामाजिक बंधुता, एकतेची भावना, सामाजिक बांधिलकी वाढण्यास मदत होईल. या अनुषंगाने शालेय पोषण आहार योजनेत लोकसहभाग वाढविण्यासाठी "स्नेहभोजन" उपक्रम राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

१) शालेय पोषण आहार योजनेंतर्गत लोकसहभाग वाढवून विद्यार्थ्यांना पौष्टिक व वैविध्यपूर्ण आहार पुरविण्यासाठी "स्नेहभोजन" हा उपक्रम राबविण्यात यावा. सदर उपक्रम "ऐच्छिक" स्वरूपाचा राहील.

२) "स्नेहभोजन" उपक्रमाची अंमलबजावणी खालीलप्रमाणे करण्यात यावी.

i) गावातील व्यक्तींचे वाढदिवस, सुवर्ण महोत्सव, अमृत महोत्सव, जन्म शताब्दी इ. तसेच, लग्न समारंभ, धार्मीक सप्ताह, निरोप समारंभ, राष्ट्रीय सण, स्थानिक पातळीवरील सण इ. बाबी या उपक्रमातंर्गत विशेष दिनाच्या औचित्यामध्ये समाविष्ट राहतील.

ii) "स्नेहभोजन" उपक्रमाचे आयोजन शाळेने करावे. त्यासाठी प्रत्येक शैक्षणिक वर्षात शाळेने वर्षभराचे नियोजन करावे. यामध्ये आवश्यकतेनुसार बदल करण्याचे अधिकार शाळा व्यवस्थापन समितीस राहतील. त्यासाठी ग्रामसभा, शालेय व्यवस्थापन समितीची सभा, पालक सभेद्वारा

जनजागृती करण्यात यावी, तसेच ग्राम पंचायत कार्यालयातील कर्मचारी / अधिकारी यांना सदर प्रक्रियेबाबत अवगत करुन त्यांना सदर प्रक्रियेमध्ये सहभागी करुन घ्यावे.

iii) शालेय पोषण आहारासोबत मिठाई, जेवण किंवा पूरक पोषक आहार (उदा. मोड आलेली कडधान्ये, शेंगदाणे, सुका मेवा (काजू, बदाम, पिस्ते, मनुका, आक्रोड, बेदाणे ) फळे, शिजविलेले पदार्थ, मिष्टांन्न ) इत्यादीचा समावेश असलेले अन्न / आहार विद्यार्थ्यांना देण्यात यावा.

iv) "स्नेहभोजन" उपक्रमांतर्गत कोणत्या तारखेस भोजन देण्यात यावे व भोजनात कोणत्या पदार्थाचा समावेश करणार आहे याबाबत संबंधित शाळेच्या शाळा व्यवस्थापन समितीने व वितरकाने एकत्रित निर्णय घ्यावा.

v) "स्नेहभोजन" उपक्रमाअंतर्गत शाळांना रोख रक्कम न देता खाद्य पदार्थ किंवा आवश्यक इतर साहित्य (पाणी पिण्याचे पिंप, पाण्याचे ग्लास, ताटे, चमचे, डिश, मुलांना बसण्यासाठी चटई अथवा सतरंजी, पाण्याची टाकी, पाणी शुध्दीकरण यंत्र इ.) देता येतील.

vi) खाद्य पदार्थ ताजे व पौष्टिक असावे.

vii) खाद्य पदार्थाचे विद्यार्थ्यांना वितरण करताना वितरकाने शाळेत उपस्थित रहावे.

viii) खाद्य पदार्थ विद्यार्थ्यांना शाळेमध्येच तसेच, मध्यान्ह भोजनाच्या वेळेतच देण्यात यावेत.

ix) सदर उपक्रम ज्या आठवडयात राबविण्यात येईल त्या आठवडयात शासनाच्या दि.०२/०२/२०११ च्या शासन निर्णयानुसार पूरक आहार देणे आवश्यक आहे.

x) यामध्ये वितरकाने जेवण दिल्यास त्या दिवशी शालेय पोषण शिजविण्यात येवू नये. तथापि, केवळ अल्पोपहार / पूरक आहार दिल्यास त्या दिवशी शाळेमध्ये शालेय पोषण आहार देणे आवश्यक राहील.

xi) सदर भोजनातून अनुचित प्रकार घडणार नाही याची दक्षता संबंधित वितरकाने घेणे आवश्यक आहे. यामध्ये अनुचित प्रकार घडल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी वितरकाची राहील.

xii) "स्नेहभोजन" उपक्रमामुळे शाळेच्या दैनंदिन कामकाजावर परिणाम होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

xiii) शालेय पोषण आहार ही विदयार्थी केंद्रीत योजना असून अतिशय संवेदनशील असल्यामुळे सदर उपक्रम राबविताना दक्षता घेणे आवश्यक आहे. वितरक / समूहास याची कल्पना देणे आवश्यक आहे.

३) "स्नेहभोजन" उपक्रमास स्थानिक स्वराज्य संस्थेच्या पातळीवर सभा व बैठकीमध्ये प्रसिध्दी देण्यात यावी. दैनिक वृत्तपत्रातून व प्रसार माध्यमातून याबाबत प्रचार करुन सामाजिक बांधिलकी व समाजाचा सहभाग वाढविण्याबाबत प्रचार करण्यात यावा. ग्राम सभा / पालक सभा / स्थानिक पातळीवरील सण, समारंभ (हळदी कंकु / गणेशोत्सव / नवरात्र / दहीहंडी) मधुन सदर योजनेस प्रसिध्दी देवुन लोकसहभाग वाढविण्यात यावा.

४) सदर उपक्रमाची सुरूवात सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षापासून करण्यात यावी.

५) जेथे "स्नेहभोजन" उपक्रम राबविला जाईल तेथील क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी या शासन निर्णयासोबत जोडलेल्या **(परिशिष्ट-अ)** मध्ये सदर उपक्रमाबाबतची माहिती भरून वरिष्ठ कार्यालयास सादर करावी.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०८१३११३५१०५०२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ramchandra Ganpat Gunjal

Digitally signed by Ramchandra Ganpat Gunjal
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=dc74b0493b4979ad0aa76763f873c23fa35ecb44970562d4aa14a832b6357e54, cn=Ramchandra Ganpat Gunjal
Date: 2015.08.13 17:32:54 +05'30'

**( रा.ग.गुंजाळ )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा.मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव
४) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
५) सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव.
६) सर्व विभागीय आयुक्त.
७) सर्व महानगरपालिका आयुक्त.
८) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
९) सर्व मुख्याधिकारी, नगरपालिका/नगरपरिषदा.
१०) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
११) राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद. मुंबई.
१२) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.

१३) संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.

१४) उपायुक्त (शिक्षण), मुंबई महानगरपालिका, मुंबई.

१५) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.

१६) शिक्षण निरीक्षक (उत्तर/दक्षिण/पश्चिम), बृहन्मुंबई.

१७) सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद

१८) सर्व कार्यासने, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग.

१९) निवडनस्ती (एस.डी.३)

# परिशिष्ट - अ

(शासन निर्णय क्र. शापोआ-२११५/प्र.क्र.१५/एस.डी.३, दि.१३ ऑगस्ट, २०१५ चे सहपत्र)

## स्नेह भोजन तक्ता क्रमांक -१

केंद्राचे नांव :- महिना :-

| अ. क्र. | शाळेचे नांव | विदयार्थी संख्या | स्नेह भोजन अंतर्गत महिनाभरात प्राप्त झालेले सामान | | वापरण्यात आलेल्या वस्तू/खाद्य पदार्थ | | शिल्लक वस्तू | | इतर वस्तू | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | खादय पदार्थ किलो मध्ये | अंदाजे किंमत | खादय पदार्थ किलो मध्ये | अंदाजे किंमत | खादय पदार्थ किलो मध्ये | अंदाजे किंमत | वस्तू | नग संख्या | किंमत |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| | | | | | | | | | | | |

केंद्रप्रमुख सही

---

## स्नेह भोजन तक्ता क्रमांक - २

तालुक्याचे नांव :- महिना :-

| अ. क्र. | केंद्राचे नांव | शाळा संख्या | विद्यार्थी संख्या | स्नेह भोजन अंतर्गत महिनाभरात प्राप्त झालेले सामान | | वापरण्यात आलेल्या वस्तू/खाद्य पदार्थ | | शिल्लक वस्तू | | इतर वस्तू | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | खादय पदार्थ किलो मध्ये | अंदाजे किंमत | खादय पदार्थ किलो मध्ये | अंदाजे किंमत | खादय पदार्थ किलो मध्ये | अंदाजे किंमत | वस्तू | नग संख्या | किंमत |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| | | | | | | | | | | | | |

गटशिक्षणाधिकारी/अधिक्षक

# स्नेह भोजन तक्ता क्रमांक – ३

जिल्ह्याचे नांव :- महिना :-

| अ. क्र. | तालुक्याचे नांव | शाळा संख्या | विद्यार्थी संख्या | स्नेह भोजन अंतर्गत महिनाभरात प्राप्त झालेले सामान | | वापरण्यात आलेल्या वस्तू/खाद्य पदार्थ | | शिल्लक वस्तू | | इतर वस्तू | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | खादय पदार्थ किलो मध्ये | अंदाजे किंमत | खादय पदार्थ किलो मध्ये | अंदाजे किंमत | खादय पदार्थ किलो मध्ये | अंदाजे किंमत | वस्तू | नग संख्या | किंमत |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| | | | | | | | | | | | | |

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)